# THE DR. LEO BARNES FOUNDATION














**Office: 101, Samudra Seema, 329 Dr. Ambedkar Rd.,**
**Bandra (W), Mumbai - 400 050. Maharashtra, India.**
**Tel.: 022 - 2605 4658 / 2648 7460**
**E-mail: leobarnesfoundation1993@gmail.com**
**Website: www.leobarnesfoundation.org**

# असा झाला श्रीगणेशा.....



## एक दूरदृष्टी

उद्दीष्ट फक्त एकच होते की, कुणाही खलाशाचे मुल कोणत्याही उपजत बहुमुल्य संसाधना पासून - **ज्ञाना** पासून वंचित रहाता कामा नये, विशेषत: किमान आर्थिक लाभापासून तर मुळीच नाही. आणि याचकरीता, डॉ. लिओ बार्नेस फाऊन्डेशन (एल.बाएफ.) त्या प्रत्येक स्वप्न-पुर्ततेसाठी सहकार्याचा हात देते ज्याचा संबंध उच्चशिक्षणाशी असतो. या प्रणालीच्या मागे एक जिद्द, एक संकल्प, एक विश्वास आणि सर्वात महत्वाचे म्हणजे काहीतरी करण्याची व यशस्वी होण्याची मुळ भावना आहे. खरे म्हणजे व्यावसायिक पेशाच्या क्षेत्रात खलाशी समाजाला कमीतकमी सुशिक्षित लोकांच्या रूपात पहाण्याचा समज आहे. आणि याच गैरसमजाला तडा देण्यासाठी एल.बी.एफ. ने विडा उचलला की, खलाशी समाजाला उच्चशिक्षणाने परीपुर्ण एक सम्माननीय आणि महत्वपुर्ण स्थान दिले जावे. हेच स्वप्न पाहिले होते डॉ. लिओ बार्नेस यानी, आणि त्याच स्वप्नपुर्तीसाठी मॅरेटाईम (सामुद्रीक) अभ्यासक्रमात उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी प्रदान केली जाते एल.बी.एफ. पुरस्कृत शिष्यवृत्ती. जिच्या अंतर्गत स्वदेशात आणि परदेशात दोन्ही जागांवर विविध पदवी आणि पदविका अभ्यास-क्रमांचा समावेश केलेला आहे.

खलाशी समाजातील सुधारणा आणि प्रगती साध्य करण्यासाठी एल.बी.एफ. खलाशी समाज आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणार्थ अनेक कल्याणकारी उपकमांचे सुद्धा आयोजन करीत असते.

यांची वचनबद्धता इतेच संपत नाही. तिचा पुढे विस्तार होऊन ती संपुर्ण समाजाला एकत्रित गुंफते आणि अशाप्रकारे एल.बी.एफ. अनेक सामाजिक प्रकल्पांना पुरस्कृत करून वचनपुर्तीशी इमान राखते.

खरोखरच हि अभिमानाची गोष्ट आहे, जिचा पाया रचला होता १ ९ ९ ३ साली, १ .५ कोटी पेक्षाही जास्त रक्कम वाटली गेली होती शिष्यवृत्या आणि खलासी समाजाच्या कल्याणकारी योज़नांसाठी.

मात्र ही स्वप्नवत गोष्ट इथेच संपत नाही. त्यांचे हे स्वप्न आपली वचन-बद्धता आणि संसाधनाच्या रुपाने प्रत्येक वर्षी फार मोठे स्वरुप धारण करीत आहे.

## एक दुरदर्शी दृष्टा

या संघटनला शक्तिमान बनविण्याच्या प्रबळ महत्वाकांक्षेने केवळ एकाच व्यक्तिने दूरदृष्टीने पाहिले पाऊल टाकले आणि ती व्यक्ति होती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. लिओ बार्नेस. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीत आणि असह्य त्रासात गेले. मात्र नुसी (NUSI) च्या उत्तुंग शिखरावर अपला ठसा उमटविण्याच्या जिद्दीच्या मार्गकमणात त्यानी **शिक्षण** रुपी बहुमुल्य संपत्ती गोला केली. ती सुद्धा कोणत्याही प्रकारचे आर्थिक पाठबळ अथवा सहकार्य नसतानाही त्यानी आपली महत्वाकांक्षा पुर्ण करताना स्वत:च स्वत:चा मार्ग निवडला व स्वसामर्थ्यावर आपले स्वप्न साकार केले. आर्थिक

समस्येमुळे त्याना शालेय शिक्षण अर्धवट सोडून जाहाजावर काम करावे लागले. अशा परिस्थतीत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर पुर्णविराम बसू शकला असता; मात्र ते एका खलाशाचे सर्वसाधारण जीवन जगण्यापेक्षा काहीतरी वेगळे करू इच्छित होते; इतरांपेक्षा खूप बेगळे. आणि म्हणुनच त्यानी पुन्हा त्या पाठ्यपुस्तकांकडे पाठ फिरवून आपल्या कारकिर्दीला कलाटणी देणारे बी.एलएलएम व मॅरीटाइम कावद्यातील डॉक्टरेट मिल्ठवण्याचे स्वप्न पुर्ण केले आणि सर्वात शेवटी त्यानी हॉवर्ड विद्यापिठातुन ट्रेड युनियन अभ्यप्रसमातील पदविका प्राप्त केली. जी माणसे त्यांच्या अत्यंत निकट सानिध्यात आली त्या सर्वांना अत्यंत चांगल्या प्रकारे आठवत असेल की, ते कायम आपल्याक्व बोटात हॉवर्डची अंगठी घालत असत. ती अंगठी त्याना सदैव प्रेरणा द्यायची की त्थाना अजुनही अनेक यशाची शिखरे गाठायची आहेत... मग मार्ग कितीही काटेरी असो की प्रवास खडतर असो. ते एक असे व्यक्तिमत्व होते ज्याला ठाऊक होते की काय योग्य आहे आणि ते मिळवण्यासाठी काय करायला हवे. अणि याच कारणांमुळे, डॉ. लिओ बार्नेस फाऊन्डेशनच्या कार्याची सुरूवात झाली त्या रु. २ २ , २ २ २ , २ २ २ मधुन, जे त्याना त्यांच्या चाहत्यांनी व अनुयायांनी त्यांच्या साठाव्या वर्षी वाढदिवसानिमित्त भेट स्वरूपात दिले होते. तळमळ फक्त एकच होती की, कोणत्याही खलाशाच्या मुलाला

ज्ञान मंदिरातून रिकाम्या हातानी माघारी पाठविले जाऊ नये किंवा जता समस्यांशी सामना त्यानी केला होता अशा दुर्धर परिस्थितीशी झुंज देण्याचे अन्य कुणाच्या नशिबी येऊ नये हेच त्यांचे स्वप्न होते आणि ते प्रत्यक्षात साकार केले आहे एल.बी.एफ.ने

## एल.बी.एफ.चे उपक्रम

### शिष्यवृत्ती

**याकरीता आवश्यक पात्रता:**

१) अर्जदार, सी.डी.सी. धारकाचे अपत्य किंवा त्याच्याशी जवळचे रक्ताचे नाते किंवा त्याच्यावर सर्वस्ची अवलंबून असलेला किंवा स्वत: सी.डी.सी. धारक असला पाहिजे. सी.डी.सी. धारक मृत झालेला असला तरीही है लागू आहे.

२) अर्जदार, एल.बी.एफ़.ला थेट देणगीरूपाने सहाय्य केलेल्या सी.डी.सी.धारकोचा अपत्य किंवा जवळचा रक्ताचा नातेवाईक किंवा त्याच्यावर सर्वस्वी अवलंबुन असलेला पाहिजे.

३) अर्जदार, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( १ २वी) परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असला पाहिजे व त्याने उच्च शिक्षणाच्या कोणत्याही शाखेत पदवी/पदत्युत्तर अभ्यास कमासाठी प्रवेश घेतलेला पाहिजे किंवा भारत सरकार किंवा राज्य सरकार शिक्षण मंडळाची मान्यता असलेल्या कोणत्याही क्षेत्रातील पदविका अभ्यास क्रमात प्रवेश घेतलेला पाहिजे.

४) अर्जदाराने कोणत्याही तंत्रज्ञान अथवा व्यावसायीक अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेतलेला असावा जो भारतीय विद्यापिठांच्या अंतर्गत ऑल इंडिया टेक्निकल डिपार्टमेंट किंवा एआयसीटीई/एनसीटीई/एमसीआय/एनएएसी/आरसीआय आणि तत्सम इतर सस्थाशी संलग्न मान्यता प्राप्त असायला हवा.

५) अन्य देशांतील विद्यापिठात अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेतलेले सुद्धा भी अर्ज करण्यास पात्र ठरतील.

## अर्जकरण्याची पद्धत

या शिष्यवृतीसाठी पात्र विद्यार्थी एल.बी.एफ. कार्यालयात विनामुल्य उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यातील अर्जानुसार खालील एल.बी.एफ. कार्यालयाच्या पत्यावर अर्ज करू शकतात

**१०१, समुद्र सीमा,**

**३२९, डॉ. आंबेडकर रोड,**

**वांद्रे (प.), मुंबई - ४०० ०५०.**

**महाराष्ट्र, भारत.**

**फोन: २६०५ ४६५८ / २६४८ ७४६०**

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत:-

१. आधार कार्डची छायांकित प्रत.

२) सी.डी.सी. ची प्रत.

३) पदवी अभ्यासक्रमासाठी माध्यमिक शालांत परीक्षा आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (किंवा तत्सम) च्या गुणपत्रिकांची प्रमाणित छायांकित प्रत.

४) महाविद्यालय/संस्थेच्या मुख्यापकाचे पत्र ज्यामध्ये अर्जदाराला कोणत्याही प्रकारे अन्य शिष्यवृती/सवलत (राखीव प्रवर्ग अंतर्गत) शासन/अन्य अशासकीय संस्था/संस्थाद्वारे अनुदान मिळते अथवा नाही याचा स्पष्ट उल्लेख केलेला असावा.

५) मुळ शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची पावती **(रु. ५०० च्या वरील पावतीवर स्टॅम्प लावलेला असावा).**

६) विद्यार्थीचा बँक खाते तपशील / पासबुकची प्रत.

७) विद्यार्थीचा मोबाइल/दूरध्वनी/ ई-मेल तपशील .

संबंधित शैक्षणिक वर्षासाठी ३१ डिसेंबर रोजी किंवा त्याच्या आधी एलबीएफ कार्यालयात अर्ज करावा.

## शिष्यवृत्तीचा तपशील

शिष्यवृत्तीसाठी दिली जाणारी रक्कम दर वर्षी बिद्यार्थ्यांची संख्या तसेच प्रत्येक वर्षीच्या कालावधीत उपलब्ध असलेल्या निधीच्या आधारावर कमी-जास्त होऊ शकते.

परदेशी विद्यापिठात अर्ज करणारे, परदेशी विद्यापिटाकडून स्विकृती पत्रासोबत विमानाचे तिकीट जमा केल्यावर, एक तरफेची रु.३५०००/ - पर्यंत हवाईभाडे मिळण्यास अधिकृत पात्र ठरतील.

**पुढील वर्षासठीची शिष्यवृत्ती मागीलवर्षीच्या शैक्षणिक वर्षाची उत्तीर्ण प्रमाणपत्रे सादर केल्यावरच दिली जाईल**

# संशोधन अनुदान

## संशोधनाचे प्रकार

संशोधनाचे विष्य प्राधान्याने भारतीय खलाश्यांच्या संबंधीत अभ्यासांतर्गत असायला पाहिजेत ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, वैद्यकिय, मानसशास्त्र, कायदेविषयक अथवा अन्य बाबी संबंधीत विषयांची हाताळणी केली जाऊ शकते.

# अनुदानाचा तपशील

अनुदान प्रकल्यावर आधारित अथवा संशोधन कालावधी एक वर्षापेक्षा वाढल्यास प्रती वर्षावर आधारीत असेल.

फाऊन्डेशनच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात अर्ज तयार करावेत व त्याच्या दोन प्रती जमा कराव्यात. ज्याची पडताळणी एक निष्णात समिती करील व आवश्यकता भासल्यास मुलाखत सुद्धा घेतली जाईल. संशोधन विषयाचे वैशिष्ठ्य व गुणवत्ता यांच्या आधारावर संशोधनासाठी अनुदानाची मर्यादा ठरविली जाईल. विश्वस्तसंस्थेच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल व त्या निर्णयाची चौकशी अथवा पडताळणी केली जाणार नाही.

# खलाश्यांचे कल्याण

**नाविक मनौविकासं केंद्र (एमएमके)** एक कल्याणकारी संस्था आहे; जी खलाशी व त्यांच्या कुंटुंबियांना सल्ला व मार्ग दर्शन देते. तिची उद्दीष्टे खालील प्रमाणे:

अ) खलाशी समाज व त्यांचे कुटुंबियांच्या सामाजिक, मनोवैज्ञानिक आणि व्यावसायिक समस्यांचा सखोल अभ्यास करणे.

ब) मुलांना मार्गदर्शन करणे, विशेषत: व्यावसायिक क्षेत्राशी संबंधीत विषयांवर.

# सल्ल ा मिळवण्याच्या विविध संधी :

एन.एम.के. कडे जाऊन खाली नमुद केल्यानुसार विविध प्रकारच्या समस्या व कार्यकमां संबंधी सल्ला-मसलत केली जाऊ शकते.

१) मुलांसाठी व्यावसायिक मार्गदर्शन व सल्ला.

२) बुद्धीमता, व्यक्तिमत्व, आवड, स्वाभाविक प्रवृत्ती यांचे मुल्यमापन.

३) खलाशी संबंधीत पेशासाठी व्यक्तिची निवड, मुलाखत व पडताळणी.

४) सेक्स, वैवाहिक जीवन व व्यक्तिगत संबंधावर सल्ला.

६) कामकाजाबाबत किंवा वैयक्तिक समस्यावर ताण-मुक्ति व्यवस्थापन.

७) कुटुंब-कल्याण कार्यक्रम.

८) नैराश्य, अमली पदार्थांचे व्यसन याबाबत मानसिक उपचार.

# कर्मचारी तपशील :

भारतातील विविध भागात कॅम्पमध्ये अनुभवी मानसशास्त्रज्ञ, सल्लागार व कर्मचारी यांच्याद्वारे सल्लामसलत केली जाईल. ते मुंबई (०२२-२६०५ ४६५८), गोवा (०८३२-२७८११६७) आणि मंगळोर (०८२४-२ ९ ८६५८) येथे एलबीएफ कार्यालयांच्या तीन ठिकाणी कार्यरत आहे.

पुढील माहिती एलबीएफ कार्यालयात मिळवता येते किंवा आपण

**www.leobarnesfoundation.org** वर वेबसाइटला भेट देऊ शकता.


Counselling Services
and
Academic Advising


Life Skill


Yoga Session


Career Guidance Seminar


Career Counselling


Addressing
Seamen Needs


Camp


Aptitude Testing

DR. LEO BARNES FOUNDATION

101, Samudra Seema, 329, Dr. Ambedkar Road,
Bandra (W), Mumbai - 400 050, Maharashtra, India.
Tel.: 022 - 2605 4658 / 2648 7460
E-mail: leobarnesfoundation1993@gmail.com
Website: www.leobarnesfoundation.org